## प्रेसनोट दिनांक :- १४/११/२०१७

### खंडणीच्या गुन्हयातील अट्टल सराईत गुंडांविरुध्द मोका कायद्यान्वये कारवाई

दिनांक ०५/०९/२०१७ रोजी १७.३० वा. चे सुमारास इसम नामे श्री. सुहास पन्नालाल बाफना वय ५१ वर्षे रा. फ्लॅट नं. २०१, जी बिल्डींग कुमार पद्मजा सोसायटी, गांधी भवन, कोथरुड, पुणे यांना शिरवळ जि. सातारा येथुन अटक आरोपी नामे (१) संतोष ऊर्फ लुभ्या चिंतामण चांदीलकर, वय-३६ वर्षे, रा लवळे, ता. मुळशी, जि. पुणे. (२) मनजित ऊर्फ आबा मानसिंग सावंत वय २६ वर्षे रा. काळमवाडी ता. वाळवा जि. सांगली (३) शशीकांत ऊर्फ पप्पु मच्छिंद्र कुंभार, वय-२८ वर्षे, रा. सत्यसाईनगर, बांदलवाडी, पिंपळी, ता. बारामती, जि. पुणे व पाहिजे आरोपी नामे (४) मयुर बाळासाहेब गोळे, रा. मु.पो. पिरंगुट, ता. मुळशी, जि. पुणे यांनी ५० लाख रुपयाचे खंडणीसाठी त्यांची इनोव्हा कार नं. एम.एच. १२ जेएम -५६०४ यासह श्री. बाफना यांना गावठी पिस्तुल व चाकुचा धाक दाखवुन पळवुन नेले होते. त्याबाबत कोथरुड पो. स्टे. पुणे येथे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा, खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव व स्टाफने करुन वरील आरोपींना शिताफीने अटक केली आहे.

वरील पैकी आरोपी संतोष ऊर्फ लुभ्या चिंतामण चांदीलकर याचे विरुध्द खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, खंडणीसाठी अपहरण असे मिळुन ३१ गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपी हा गुन्हे करण्यासाठी वेगवेगळे साथीदार घेवुन गुन्हे करतो. सदर आरोपी विरुध्द यापुर्वी मोका कायद्यान्वये कारवाई करण्यात आली होती. सदरचा आरोपी हा दिनांक १०/०४/२०१७ रोजी पोलीसांच्या रखवालीतुन पळुन गेला होता.

वरीलपैकी पाहिजे आरोपी मुयर बाळासाहेब गोळे याचे विरुध्द खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, खंडणी असे मिळुन एकुण ९ गुन्हे दाखल आहेत.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव यांनी केलेल्या तपासादरम्यान, आरोपी नामे संतोष ऊर्फ लुभ्या चिंतामण चांदीलकर याने वर नमुद आरोपींची संघटीत गुन्हेगारी टोळी तयार करुन स्वतःच्या व टोळीच्या सक्रिय सदस्यांच्या आर्थिक फायद्यासाठी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने व वरील आरोपींचा पुर्वाभिलेख पाहता, वर नमुद गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) या कलमाचा जादा अंतर्भाव करण्याकरीता मा. अपर पोलीस आयुक्त सो. गुन्हे, पुणे यांना प्रस्ताव पाठविला असता, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे यांनी दिनांक १३/११/२०१७ रोजी वर नमुद कलमाचा जादा अंतर्भाव करण्याकरीता पुर्वमान्यता आदेश दिला आहे. त्यानुसार सदर गुन्हयास नमुद कलमाचा जादा अंतर्भाव केला आहे. पुढील तपास गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. समीर शेख हे करीत आहेत.

वरील कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त श्रीमती रश्मि शुक्ला मॅडम, मा. पोलीस सह आयुक्त, श्री. रविंद्र कदम, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रदीप देशपांडे, पोलीस उप आयुक्त श्री. पंकज डहाणे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे -१, श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, सपोनि. श्री. सुनिल गवळी, सपोनि श्री. विठ्ठल शेलार, पोलीस कर्मचारी नामे अविनाश मराठे, सुधीर इंगळे, प्रमोद मगर, मंगेश पवार, हनुमंत गायकवाड, धीरज भोर, रमेश गरुड, शिवाजी घुले, संतोष मते, भाऊसाहेब कोंढरे, फिरोज बागवान, सचिन अहिवळे, रणजित अभंगे, एकनाथ कंधारे, प्रदीप शिंदे, नारायण बनकर, शिवरंग बोले यांनी केली आहे.

प्रेसनोट

## खंडणी विरोधी पथकाकडून हडपसर भागात तीन गावठी कट्टे व दोन काडतुसे जप्त

दि. १०/११/२०१७ रोजी खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी व कर्मचारी हडपसर पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पथकातील पोलीस नाईक प्रदिप शिंदे यांना दोन इसम शेवाळवाडी जकात नाका जवळील जोशी वडेवाले हॉटेल समोर, हडपसर, पुणे येथे उभे असून सदर इसमांचे कब्जात तिन गावठी कट्टे व दोन काडतुसे आहेत. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने, खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, यांचे दिमतीत खंडणी विरोधी पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक श्री. विठ्ठल शेलार व स्टाफने सापळा रचुन १) धिरेंद्रकुमार रामेश्वर सिंह, वय-२५ वर्षे, धंदा- ड्रायव्हर, रा. उकुर्मी, थाना- ओबरा, जिल्हा- औरंगाबाद, बिहार राज्य २) पंकजकुमार शर्मानंद सिंह, वय-४७ वर्षे, धंदा- ड्रायव्हर, रा. पो. कलेर, थाना- कलेर, जि. अरवल, बिहार राज्य यांना पकडून त्यांचे कब्जातुन तीन गावठी कट्टे व दोन जिवंत काडतूसे असे किं.रुपये ३०,२००/- चे अग्निशस्त्र जप्त करण्यात आले आहेत. सदरबाबत हडपसर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील कारवाई ही श्री. प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, पुणे श्री. समिर शेख, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १ यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, सहा. पोलीस निरीक्षक विठ्ठल शेलार, व पोलीस स्टाफ एकनाथ कंधारे, प्रदिप शिंदे, शिवाजी घुले, रमेश गरूड, संतोष मते, रणजित अभंगे, सुधीर इंगळे, मंगेश पवार यांनी केलेली आहे.

